International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.4
Volume 6, Issue 1, Jan-Mar 2026 ID: IJCRTA000238 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# जनगणना आकडेवारीचा आरक्षीत जागांवर होणारा परिणाम एक अभ्यास

## स्वप्निल गोविंदराव मुळे

**Author Affiliation:**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, पिपल्स महाविद्यालय नांदेड, एम.ए. राज्यशास्त्र (सेट), एम.ए. अर्थशास्त्र, एल.एल.बी., एल.एल.एम. (क्रिमीनल), पीएच.डी. ॲपीयर, रा. औंढा नागनाथ ता. औंढा (ना.) जि.हिंगोली
Email: swapnil.muley1@gmail.com

**Citation of Article:** मुळे, एस. जी**.** (2026). जनगणना आकडेवारीचा आरक्षीत जागांवर होणारा परिणाम एक अभ्यास. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 6 (1), pg. 93-97. ijcrta.org

**DOI: 10.5281/zenodo.19498113**

**प्रस्तावना :-**

कोणत्याही देशाच्या विकासासाठी लोकसंख्या हा महत्वाचा घटक आहे. लोकसंख्या जास्त झाली तर त्याचा देशाच्या विकासावर विपरीत परिणाम होतो. लोकसंख्या अत्यंत कमी झाली तरी त्याचा देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने परिणाम होतो. प्लेटोच्या मते राज्याची लोकसंख्या 5040 एवढी असली तर ते आदर्श राज्य बनते. प्राचीन काळी सुध्दा वेगवेगळया पध्दतीने लोकसंख्या मापन केले जात असल्याचे पुरावे आढळुन येतात. कौटील्याच्या अर्थशास्त्र ग्रंथात लोकसंख्या गणनेचे उल्लेख आहेत. ब्रिटीश काळात 1872 साली पहिली जनगणना झाली होती. त्यानंतर 1881 पासुन ती नियमित सुरु झाली. ब्रिटीश व्हाईसरॉय लॉर्ड मेयो यांच्या काळात 1865 ते 1872 दरम्यान विविध टप्यात पहिली जनगणना झाली होती. 1881 पासुन दर दहा वर्षाने सातत्याने जनगणना करण्याची पध्दत सुरु झाली ती आजपर्यंत सुरु आहे. स्वतंत्र भारताची पहिली जनगणना 1951 मध्ये झाली होती. 1948 च्या जनगणना कायदयानुसार केंद्रीय गृह मंत्रालया अंतर्गत रजिष्ट्रार जनरल आणि जनगणना आयोग या प्रक्रियेचे नियोजन करत असतात. याचा उद्देश लोकसंख्या, साक्षरता, व्यवसाय, जात आणि धर्म यासारख्या सामाजिक आर्थिक बाबीची माहिती गोळा करणे हा असतो. 1931 मध्ये ब्रिटीश सरकारने पहिल्यांदा जात निहाय जनगणना केली होती. त्यानंतर परत जात निहाय जनगणना झाली नाही. सध्याच्या जनगणना मध्ये धर्म आणि अनुसुचीत जाती जमाती व खुला प्रवर्ग यांची लोकसंख्या माहिती संकलीत केली जाते. 2026 ची जनगणना ही भारताची 16 वी जनगणना आहे जी की, सन 2021 मध्ये होणार होती परंतु कोरोना महामारीमुळे पुढे ढकलली होती. जनगणनेतील लोकसंख्येचा माहितीचा शासनाला धोरण ठरविण्यासाठी उपयोग होतो.

**विषयाचे महत्व :-**

जनगणना आकडेवारीचा आरक्षीत जागांवर होणारा परिणाम एक अभ्यास हया विषयाचे महत्व देशाचे आरक्षण धोरण निश्चित करतांना लक्षात येते. 1951 पासुन झालेल्या जनगणनामध्ये अनुसुचित जाती, जमातीचे सर्वेक्षण झालेले आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम 15 (4) नुसार सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या नागरीकांच्या प्रगतीसाठी तसेच अनुसुचीत जाती जमातीसाठी आरक्षणाची तजवीज केलेली आहे. तसेच घटनेच्या कलम 15 (5), 16(4), 16

(4अ ), 16 (4 ब) मध्ये सुध्दा शिक्षण, नौकरी, पदोन्नती मध्ये आरक्षण निश्चित केले आहे. घटनेच्या कलम 330 व 332 नुसार लोकसभा व राज्य विधानसभामध्ये अनुसुचीत जाती जमातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्याची तरतुद केली आहे. तर घटनेच्या कलम 343 (ड) नुसार पंचायत राज संस्थानमध्ये आरक्षणाची तरतुद केलेली आहे. वरील सर्व आरक्षण सोडत काढत असतांना जनगणना मधील आकडेवारीचा आधार घेतला जातो व त्यानुसार आरक्षण निश्चित होत असते. त्या अनुषंगाने या विषयाचे महत्व आधोरेखीत होते. लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपालीका, नगरपरिषद, नगरपंचायत, महानगरपालीका यातील निवडणुकी वार्ड/प्रभाग रचने पासुन आरक्षण सोडती पर्यत जनगणने मधील आकडेवारीचा आधार घेतला जातो.

**प्रस्तुत विषयात अभ्यासाचे हेतु/उदिष्टये पुढील प्रमाणे आहेत :-**

जनगणना मधील लोकसंख्यात्मक आकडेवारीचा राजकीय, सहभागाच्या दृष्टीने आरक्षीत जागांवर होणारा परीणाम तपासणे हा या विषयाचा उद्देश आहे. तसेच जनगणना मध्ये अशा कोणत्या उणीवा आहेत ज्याचा परिणाम हया आरक्षण सोडतीवर होऊ शकतो याचा शोध घेणे हा उद्देश आहे.

**विषयाची गृहीतके :-** या विषया अंतर्गत अभ्यास करतांना पुढील गृहीतके आहेत.

1) जनगणनेत जातींची नोंद योग्य त्या प्रवर्गात होत नाही.
2) स्थलांतरीत नागरीकांची नोंद चुकीच्या जागी होत असल्याने आरक्षण सोडतीवर परिणाम होतो.
3) राखीव प्रवर्गाची अचुक आकडेवारी संकलीत होत नसल्याने राखीव जागांमध्ये घट होते.

**संशोधन पध्दती :-** प्रस्तुत संशोधणात निरीक्षण पध्दती, समाजशास्त्रीय, विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर केला आहे व संशोधन कार्यासाठी प्राथमीक व व्दितीयक माहितीचा वापर करण्यात आला आहे. तसेच वृत्तपत्रे, पुस्तके, इंटरनेटचाही आधार घेण्यात आला आहे. व त्यानुसार अभ्यास केलेला आहे.

**विषयाचे विश्लेषण :-** देशामध्ये झालेल्या वेगवेळया निवडणुकांमध्ये जनगणना मधील आकडेवारीचा आधार घेवुन आरक्षण धोरण निश्चित केले जाते. मागील जनगणना ही 2011 साली झाली होती त्याचा आधार घेऊन आजपर्यत झालेल्या निवडणुकांमध्ये आरक्षण राखीव करण्यात आले होते.

शासकीय कार्यालयातून माहिति घेतली असता असे दिसुन आले की, आरक्षण सोडत ही मागील जनगणनेच्या प्रवर्गनिहाय आकडेवारीवरुन काढण्यात येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रत्येक गावातील अशी आकडेवारी काढुन आयोगाच्या निर्देशाप्रमाणे कधी लोकसंख्येच्या चढत्या तर कधी उतरत्या क्रमांकाने आरक्षण सोडत काढली जात असल्याचे दिसुन आले. सद्यस्थितीला जणगणनेत फक्त अनु.जाती, जमाती यांचीच प्रवर्ग निहाय आकडेवारी घेतली जाते असे असतांना इतर मागासवर्गीय (OBC) चे आरक्षण सुध्दा याच नियमानुसार कोणतीही गनना नसतांना कसे काढले जाते हे विशेष आहे.

जनगणना आयुक्तालयाच्या Census in india या संकेतस्थळावरुन जनगणनेच्या सन 2011 च्या आकडेवारीचा जिल्हयाचा एस.सी., एस.टी. चा जातनिहाय डेटा संकलीत केला असता व केंद्रीय गृह मंत्रालयास माहिती अधिकारात याबाबत विचारलेल्या माहितीच्या उत्तरावरुन असे निदर्शनास आले की, केंद्र शासणाच्या यादीनुसार ज्या जाती केंद्रात अनु. जाती/जमाती मध्ये समाविष्ठ होतात. त्यांचीच नोंद जनगणनेत एस.सी, एस.टी. मध्ये केली जाते.

International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.4
Volume 6, Issue 1, Jan-Mar 2026 ID: IJCRTA000238 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

राज्यांनी काही जाती S.C. ST मध्ये समाविष्ठ केल्या असल्या तरी त्यांची नोंद S.C., ST मध्ये होत नाही असे दिसुन येते. उदा. महाराष्ट्रातील बौध्द समाज हा 1956 नंतरचा बौध्द व पुर्वीश्रमीचा महार वर्ग आहे. महाराष्ट्र राज्यात बौध्द जात ही अनु.जातीमध्ये येते. अनु.जाती मध्ये सर्वाधिक संख्येने असणारा वर्ग बौध्द आहे. परंतु असे असतांनाही जनगणनेत बौध्द जात सांगणाऱ्या व्यक्तीची नोंद ही खुल्या प्रवर्गात होते. तर महार जात सांगणाऱ्या लोकांची नोंद अनु.जातीमध्ये होते. सद्यस्थितीला महार जात सांगणारे कमी आहेत. त्यामुळे जनगणनेत जातीची नोंद योग्य प्रवर्गात न झाल्यामुळे जनगणनेतील आकडेवारी नुसार सुटणारे आरक्षण कसे योग्य होईल हा प्रश्न निर्माण होतो. उदा. जनगणना 2011 नुसार हिंगोली जिल्हयातील आकडेवारी पाहिली असता अनुसुचीत जातीची लोकसंख्या 1,82,000 + आहे. तर बौध्द धर्म सांगणाऱ्या व्यक्तीची संख्या 1,76,000+ आहे असे आढळुन आले. त्यामुळे बौध्द जात एवढया प्रमाणात आहे तर बाकी अनुसुचीत जातीतील 58 जाती 6000 हजार आहेत का? असा प्रश्न उत्पन्न होतो. यावरुन महार आणि बौध्द या शिर्षकाखाली संख्या विभागली गेल्याने त्याचा संपूर्ण राज्यभरात व भारत भरात आरक्षीत जागांवर परीणाम झालेला दिसुन येतो. कारण बौध्द जातीची नोंद अनुसुचीत जातीत न झाल्यामुळे लोकसभा व विधानसभेच्या राखीव जागा लोकसंख्याच्या प्रमाणात सोडण्यात आल्या नाहीत. त्यामुळे राखीव जागात घट झालेली दिसुन येते.

दुसरी महत्वाची बाब अशी की, सरपंच पद आरक्षण सोडत इतिवृत्तांतचा तिन तालुक्याचा हिशोब पाहिला असता, कागदपत्रावरुन असे अवलोकन झाले की, ज्या गावात सरपंच पद आरक्षण सुटणार आहे. त्या गावात त्या प्रभागासाठी आरक्षण सोडणे आवश्यक आहे. तसे न करता वार्ड राखीव न करता गावांच्या नावांच्या चिठ्ठया टाकुन आरक्षण सोडत काढली जाते. परिणामी अनेक गावांत सरपंच पद रिक्त राहिले. सन 2020-21 वर्षात औंढा (ना.) तालुक्यात अनु.जमातीसाठी 101 ग्रामपंचायतीपैकी 17 ग्रामपंचायती आरक्षीत झाल्या होत्या. त्या 17 पैकी 14 गावच्या ग्रामपंचायतीची सरपंच पद रिक्त राहिली कारण त्या गावांत अनु.जमाती (S.T) साठी वार्डच राखीव करण्यात आला नव्हता वार्ड का राखीव नव्हता विचारले असता तेथे आवश्यक संख्या नव्हती म्हणून वार्ड आरक्षीत नव्हता असे उत्तर मिळाले इतर मागासवर्गीय प्रवर्गाची सुध्दा दोन सरपंच पदे आशा कारणामुळे रिक्त राहिली. आवश्यक संख्या नव्हती तर ती गावे ST व OBC ला कशी सुटली अशी विचारणा केली असता, असे उत्तर मिळाले की जनगणनेच्या काळात त्या गावात S.T. व OBC ची कुणी व्यक्ती राहुन गेली असेल म्हणुन त्या आधारावर त्या गावात S.T. साठी आरक्षण सुटले असे कारण दिले. अशा पध्दतीने इतर मागासवर्गीय (OBC) साठी राखीव झालेल्या 2 ग्रामपंचायती ची सरपंच पदे रिक्त राहिली. S.T. व OBC साठी औंढा तालुक्यात सरपंच पद आरक्षण सुटले आणि उमेदवार निवडुन आला नसल्याने पद रिक्त राहिलेल्या गावातील माहिती घेतली असता आढळुन आले की, त्या गावांत त्या प्रवर्गाचा नागरीकच नाही. म्हणजेच आडातच नाही तर पोहऱ्यात कुठुण येणार असा प्रश्न पडतो. अशा रिक्त राहिलेल्या गावातील पदे नंतर इतर दुसऱ्या प्रवर्गासाठी सोडुन भरण्यात आली असली तरी मुळ प्रवर्गावर ही ग्रा.पं. सदस्यांमधून निवड असलेली सरपंच पद आरक्षण सोडत, असुन अडचन नसुन खोळंबा हया म्हणीसारखीच आहे.

म्हणजेच स्थलांतरीत नागरीकांची नोंद त्यांच्या मुळ गावात न करता सध्याच्या स्थायीक गावात होत असल्याने तेथे त्यांची प्रवर्गाची नोंद होत आहे व मुळ गावाची लोकसंख्या कमी दर्शविल्याने तेथेआरक्षणा पासुन वंचीत राहात आहे. उदा. नांदेड जिल्हयात कोचींग क्लासेस च्या नावाखाली अनेक कुटूंबीय दोन तीन वर्ष राहतात. परंतु त्याचे मतदान हे मुळ गांवी असते. त्यामुळे त्यांची नोंद जर नांदेड येथे राहिली तर नांदेड लोकसभा किंवा विधानसभा एखादया प्रवर्गासाठी राखीव होऊ शकतो. त्यामुळे मुळ नागरीकांवर ही बाब अन्याय कारक होऊ शकते असे दिसुन आले आहे.

राखीव प्रवर्गाची अचुक आकडेवारी संकलीत होत नसल्यामुळे राखीव जागांमध्ये संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळत नसल्यामुळे राखीव जागांमध्ये घट होत असल्याचे दिसुन आले. आजपर्यंतच्या जनगणनामध्ये बौध्द जातीची नोंद खुल्या प्रवर्गात झाल्याने अनुसुचीत जातीची आकडेवारी घटली आहे आशा परिस्थितीत सध्या मतदारसंघ पुर्नरचना च्या माध्यमातून लोकसभा व विधानसभाची मतदारसंघ वाढणार आहेत. व त्याचा आधार 2011 च्या

जनगणनेनुसार घेतला जाणार आहे. परंतु यामुळे सुध्दा अनुसुचीत जातीची योग्य आकडेवारी उपलब्ध नसल्याने मिळणारे प्रतिनिधीत्व हे नगन्य स्वरुपाचे राहिल असे दिसुन येते.

**निष्कर्ष व शिफारशी :-**प्रस्तुत विषयाच्या अभ्यासावरुन पुढील प्रमाणे निष्कर्ष व शिफारशी सांगता येतात :-

1) लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण राखीव करण्यासाठी जातींची नोंद जनगणनेत योग्य त्या प्रवर्गात झाली पाहीजे.
2) स्थलांतरीत नागरीकांची नोंद घेतांना सर्वेक्षण कुठेही होत असेल तरी त्यांचा डेटा त्यांच्या मुळ गांवी जेथे मतदान आहे तेथे वर्ग केला पाहिजे.
3) लोकसंख्येच्या प्रमाणात त्या प्रवर्गास आरक्षीत जागांची निश्चिती केली पाहिजे.
4) जनगणनेतील नागरीकांनी सांगीतलेल्या माहितीची एक प्रत त्यांना मिळाली पाहिजे.

**मुल्यमापन :-**

अशा प्रकारे जनगणना आकडेवारीचा आरक्षीत जागांवर होणारा परिणाम एक अभ्यास हया विषयाचा अभ्यास करतांना सर्वसामान्यांना जनगणना हा विषय गौण वाटत असला तरी तो किती महत्वाचा आहे हे वरील अभ्यासावरुन स्पष्ट होते. स्वातंत्र्याची 75 वर्षे झाली तरी आजही आरक्षणाचा लाभ कसा पोचत नाही ते वरील माहितीवरुन दिसुन येते. म्हणून जातींची नोंद योग्य प्रवर्गात न झाल्याने कशा पध्दतीने संपुर्ण आरक्षण पध्दतीची रचना चुकत आहे हे दिसुन येते. याचा परिणाम अर्थसंकल्पातील निधी, संख्येनुसार आरक्षण, राजकीय आरक्षण यावरही होतांना दिसुन येतो.

**संदर्भ सुची:-**

**अ) मराठी**

1. संदर्भ 1 जिल्हा सांख्यिकी कार्यालय हिंगोली,जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-2023,अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन ,मुंबई पान क्र.1
2. एड.बी.सी.कांबळे [2007]:"समग्र आंबेडकर चरित्र खंड 5 वा'', सुगावा प्रकाशन पुणे ,पान क्र.24.
3. एड.बी.सी.कांबळे [2007]:"समग्र आंबेडकर चरित्र खंड 7 वा'', सुगावा प्रकाशन पुणे ,पान क्र.46
4. डॉ.भनगे रवींद्र [2020]: "आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण'', डायमंड पब्लिकेशन पुणे,प्रथमआवृत्ती ,पान क्र.13
5. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, "शुद्र पूर्वी कोण होते'',आनंद प्रकाशन,औरंगाबाद ,द्वितीयावृत्ती 2023 ,पान क्र.77
6. प्रा.व्ही.बी.पाटील, [2005]: "महाराष्ट्रातील पंचायतीराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था'', के'सागर प्रकाशन,पुणे,द्वितीयावृत्ती ,पान क्र.44
7. "भारताचे संविधान'',[2014],भारत सरकार तर्फे प्रकाशित शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,पुणे,द्वितीयावृत्ती ,पान क्र.132

8. चौधरी, [2021] : "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि त्या खालील नियम", चौधरी लॉ पब्लिशर्स जळगांव –पुणे , 41 वी आवृत्ती.
9. ॲड. अभया शेलकर: [2018] : "महाराष्ट्र निवडणुक कायदे", नाशिक लॉ हाऊस औरंगाबाद, दुसरी आवृत्ती.

**ब) संकेतस्थळे (Websides)**

1. http://www.censusinindia.gov.in
2. http://www.hingoli.nic.in
3. http://www.zphingoli.in
4. http://vlist.in.
5. https://mr.wikipedia.org
6. https://indiankanoon.org
7. https//:lawbhoomi.com